# १. बिनचुक गाव नमुना नंबर ७/१२ साठी आवश्यक पडताळणी सुची

1. सर्व्हे नंबर योग्य प्रकारे लिहीला आहे का ?
2. ब्लँक ७/१२ गांवात नाहीत ना ?
3. बंद असलेल्या ७/१२ ची यादी बरोबर आहे का ?
4. एकूण खातेदारांची संख्या खाते प्रकारनिहाय बरोबर आहे का ?
5. ७/१२ वर नसलेली अथवा निरंक क्षेत्राची खाती गांवात नाहीत ना ?
6. प्रत्येक ७/१२ वर भूधारणा पध्दती निवडलेली आहे का ? व भोगवटादार वर्ग-२ असलेल्या ७/१२ साठी उपप्रकार १ ते १४ पैकी एक निवडलेला आहे का ?
7. संगणकीकृत गा.न.नं. १ (क) व हस्तलिखीत गा.न.नं. १ (क) जुळतो का ?
8. शेती क्षेत्रासाठी एकक हे.आर.चौ.मी. व बिगरशेती क्षेत्रासाठी एकक आर.चौ.मी. निवडले आहे का ?

९. शेती क्षेत्राचा आकार ७/१२ वर लिहीला आहे व खातेदाराच्या नांवासमोर त्याचे क्षेत्र व आकार नमूद केले आहे

११. का ? (संयुक्त व समाईक खातेप्रकारामध्ये एका खातेदाराच्या नावासमोर व समाईकात क्षेत्र व आकार नमूद केला आहे का ? )

१०. पोट खराब क्षेत्र वर्ग अ आहे की वर्ग ब चे व त्याप्रमाणे योग्य रकान्यात नमुद केले आहे का ?

11. बिगरशेती क्षेत्राचे बाबत एकक आर. चौ.मी. निवडून हस्तलिखीत ७/१२ वर आर चौ.फुट व एकर गुंठे व हे. आर. क्षेत्राचे रुपांतर आर.चौ.मी. मध्ये करुन क्षेत्र खातेदाराच्या नांवासमोर नमूद केले आहे का ?
12. खातेदराच्या नांवासमोर क्षेत्र नमूद करुन आकार नमुद केला आहे का ? व आणेवारी काढली (शुन्य करुन) आहे का ? भोगवटादाराचे सदरी असलेल्या नावासमोरील क्षेत्र व आकाराची बेरीज गटाचे एकुण क्षेत्र व आकाराशी जुळते का ?
13. ७/१२ वर खातेदाराचे नांव ज्या फेरफार क्रमांकाने दाखल झाले आहे तो फेरफार क्रमांक त्या खातेदाराचे पुढे लिहिला आहे का ?
14. ७/१२ वरील सर्व जुने फेरफार क्रमांक संगणकीकरणात ( History ) घेतले आहेत का ?
15. ७/१२ जेवढया खात्यांमध्ये विभागला आहे तेवढेच खाते क्रमांक ७/१२ वर नमूद केले आहेत का ?
16. एखाद्या खात्याला कंस झाला असल्यास संबंधीत खातेदाराच्या नांवाला देखील कंस झाला आहे आहे ना ? किंवा खातेदाराचे नांवाला कंस झाला असल्यास खात्याला कंस झाला आहे ना ? खात्री करा.
17. इतर हक्कात कोणत्याही नोंदी दुबार नाहीत ना ? अथवा वगळलेल्या नाहीत ना ? याबाबत खात्री करा.
18. गा.न.नं. १२ वर पिक पाहणी / पिक पेरे पत्रक सन २०१६-१७ पर्यंत अद्ययावत केलेले आहे.
19. हस्तलिखीत प्रमाणे पिकपाहणी दूरुस्त केली आहे का ?
20. जलसिंचनाची साधणे, पडक्षेत्र, झाडांची नांवे व संख्या नमुद केली आहेत का ?